मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 7 फेब्रुवारी 2025 | पान- 1


# उद्योजकांना त्रास दिल्यास थेट मकोका लावणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा : पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे भूमिपूजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा हे महाराष्ट्राच्या गुंतवणुकीचे कॅपिटल आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे भांडवल म्हणून पुण्याकडे पाहिले जाते. पुणे जिल्ह्यामध्ये अनेक प्रकारची गुंतवणूक येत आहे. या गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण ठेवणे महत्त्वाचे असून जिल्ह्यातील कोणत्याही उद्योग किंवा उद्योजकाला, कसल्याही प्रकारचा त्रास झाल्यास थेट मकोका अंतर्गत कारवाई करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात उद्योगांना कोणत्याह प्रकारचा त्रास होता कामा नये अशा सूचना देखील मुख्यमंत्र्यांनी केल्या.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी-चिंचवड नवीन इमारतीचे भूमिपूजन पोलीस अधिक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण नवीन इमारतीचे भूमिपूजन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयाचे पोलीस विश्रामगृहाचे भूमिपूजन,महाळुंगे औद्योगिक पोलीस संकुलाचे भूमिपूजन,'शिवनेरी' सभागृहाचे उदघाटन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विकास कामांचे व उपक्रमांचे ई-भूमिपूजन आणि लोकार्पण करण्यात आले. यावेळी पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार महेश लांडगे, योगेश कदम, विजय शिवतरे, अण्णा बनसोडे, शंकर जगताप, बापूसाहेब पठारे, शरद सोनवणे, बाबाजी काळे, सुनील शेळके, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आदी उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, पिंपरी चिंचवड शहराचे विस्तारीकरण गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात झाले. औद्योगीकरण वाढले अनेक क्लस्टर तयार झाले. या ठिकाणी गुंतवणूक देखील मोठ्या प्रमाणात वाढत आहे.हे सर्व होत असताना स्वतंत्र आयुक्तालयाची गरज निर्माण झाली. वेळोवेळी त्याबाबत मागणी होत गेली. ही मागणी आता पूर्णत्वाला जाणार आहे. 2025 मध्ये पिंपरी चिंचवड शहराचे नवीन आयुक्तालय स्वतंत्र इमारतीमध्ये स्थलांतरित होईल. सुसज्ज, अत्याधुनिक आणि खाजगी गृहनिर्माण धोरणालाही लाजवेल असे अद्यावत सरकारी कार्यालय निर्माण होणार आहे. अत्यंत निकडीची गरज म्हणून आयुक्तालयाची निर्मिती ती देखील सीएसआर फंडाच्या माध्यमातून हे कौतुकास्पद आहे.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले पुण्याच्या भागांमध्ये मधून मधून उद्योजकांकडून काही तक्रारी येतात. जाणीवपूर्वक त्रास, ब्लॅकमेलिंग आणि वसुलीच्या तक्रारी केल्या जातात.मात्र यापुढे असे काहीही खपवून घेतले जाणार नाही.यामध्ये कोणत्याही पक्षाचा, कोणाचाही पदाधिकारी असू दे थेट मकोका अंतर्गत कारवाई करा. पुणे हे महाराष्ट्राच्या गुंतवणुकीचे कॅपिटल आहे. त्यामुळे येथे उद्योगाला कोणत्याही प्रकारचा त्रास सहन केला जाणार नाही असे देखील फडणवीस म्हणाले.

### थेट परकीय गुंतवणूक गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र अग्रेसर

» चिखलीतील पोलीस आयुक्तालयाच्या भूमिपूजनापूर्वी ख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मावळ, पुणे येथे लोट्टे इंडियाच्या हॅवमोर आईस्क्रीम उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन केले. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र जगात अग्रेसर असून महाराष्ट्र उद्योग विभाग यामध्ये महत्वाची भूमिका बजावत आहे, भारतातील ३५% थेट परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे, या गुंतवणुकीमळे महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीचे केंद्र बनत आहे. दावोसमध्ये महाराष्ट्राने १६ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक खेचून आणली.महाराष्ट्र शाश्वत औद्योगिक प्रगतीसाठी सज्ज आहे असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

---

# इंद्रायणीनगर भागातील पीएमपीएल बस सेवा सक्षम करा

## शिवराज लांडगे यांची मागणी : संतनगर, स्पाईन रोड, सेक्टर 12 या भागात बस सेवेची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणीनगर परिसर प्रचंड प्रमाणात वाढत आहे. या भागामध्ये मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे. अनेक कोचिंग क्लास, आस्थापना, सरकारी कार्यालय देखील वाढत आहेत. या भागामध्ये चांगले आरोग्य सेवा असल्यामुळे आणि रुग्णांची देखील ये जा या भागात असते त्यामुळे या भागांमध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम असणे गरजेचे असल्याची मागणी भाजपचे युवा नेते शिवराज लांडगे यांनी केली आहे.

भाजप नेते तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली युवानेते शिवराज लांडगे यांनी याबाबतचे निवेदन पुणे परिवहन महामंडळाचे वाहतूक व्यवस्थापक सतीश गव्हाणे यांना दिले आहे. तातडीने याबाबत कार्यवाही व्हावी अशा सूचना आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला दिल्या आहे.



दिलेल्या निवेदनामध्ये शिवराज लांडगे यांनी म्हटले आहे की, आळंदी ते निगडी ही बस आळंदी जय गणेश साम्राज्य घरकुल निगडी या मार्गे आहे. परंतु संतनगर चौक, स्पाईन रोड, स्पाईन मॉल, सेक्टर १२ येथील नागरिकांना जाण्या-येण्यासाठी अडचणीचे होत आहे. तसेच चिखली ते मनपा हि बस सुद्धा सेक्टर १३ टेल्को रोड सेक्टर १२ येथील प्रधानमंत्री आवास योजना खंडेवस्ती-गवळीमाथा ते मनपा या मार्गाने सुरु करण्यात यावी अशी मागणी आहे.

या ठिकाणी कामाकरिता व शिक्षणाकरिता अनेक जण बसने प्रवास करतात. परंतु सध्या या ठिकाणी बस नसल्याने या परिसरातील नागरिकांची गैरसोय होत आहे. वास्तविक या ठिकाणी प्रवासी, विद्यार्थी, कामकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. ह्या सर्वाचा विचार केला तर या मार्गे बस सेवा असणे हे अत्यंत गरजेचे आहे. तरी, या मार्गावरील बस सेवा सुरु करणेबाबत स्थानिकांची मागणी असुन एक लोकहिताची बाब म्हणून बस सेवा सुरु करण्यात यावी, असे शिवराज लांडगे यांनी पत्रात म्हटले आहे.

# पुण्यातील खासगी रुग्णालयांकडून नियम धाब्यावर!

## महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सर्व खासगी रुग्णालयांची तपासणी सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

खासगी रुग्णालयांच्या विरोधात तक्रारी वाढल्याने राज्य पातळीवर खासगी रुग्णालयांची तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने आतापर्यंत सुमारे ७१४ खासगी रुग्णालयांची तपासणी केली आहे. यात तब्बल १० टक्के रुग्णालयांनी नियमांचे पालन केले नसल्याचे समोर आले असून, त्यांना नोटीस बजाविण्यात आली आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सर्व खासगी रुग्णालयांची तपासणी सुरू आहे.

आरोग्य विभागाने महिनाभरात सुमारे ७१४ रुग्णालयांची तपासणी केली. त्यात ७६ रुग्णालयांनी नियमांचे पालन केले नसल्याची बाब निदर्शनास आली. या रुग्णालयांना आरोग्य विभागाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. रुग्णालयाची बॉम्बे नर्सिंग होम ॲक्टनुसार नोंदणी झाली आहे का, याची तपासणी केली जात आहे. रुग्णालयातील डॉक्टर आणि परिचारिकांची निकषाप्रमाणे संख्या आणि रुग्णालयाबाहेर लावलेले दरपत्रक या बाबींची तपासणी करण्यात येत आहे. रुग्णालयाकडील अग्निशामक दलाचे ना हरकत प्रमाणपत्र आणि जैववैद्यकीय कचऱ्याच्या विल्हेवाटीबद्दल माहिती घेतली जात आहे, अशी माहिती सहायक आरोग्य अधिकारी सूर्यकांत देवकर यांनी दिली.




आरोग्य विभागाच्या तपासणी मोहिमेत खासगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या आणि किमान एक रुग्णशय्या असलेल्या रुग्णालयांचा समावेश आहे. याचबरोबर ॲलोपथी, आयुष, युनानी, नॅचरोपथी यासह सर्व शाखांच्या रुग्णालयांची तपासणी केली जात आहे. रुग्ण २४ तास दाखल करून घेतला जात नाही, अशा डे केअर सेंटरचा यात समावेश नाही. महापालिकेच्या आरोग्य विभागाने प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात क्षेत्रीय आरोग्य अधिकारी, परिचारिका आणि कर्मचारी अशा तीन जणांच्या पथकावर तपासणीची जबाबदारी सोपविली आहे. शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालयांत अशी १५ पथके रुग्णालयांची तपासणी करीत आहेत.

### सुधारणेसाठी महिन्याचा कालावधी

» नियमांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांना नोटीस बजावून एक महिन्याचा कालावधी सुधारणा करण्यासाठी देण्यात आला आहे. काही रुग्णालयांनी या नोटिशीला उत्तर देऊन सुधारणा केल्याचे आरोग्य विभागाला कळविले आहे. एक महिना पूर्ण झाल्यानंतर आरोग्य विभागाकडून नोटीस पाठविलेल्या रुग्णालयांची तपासणी करून सुधारणा झाल्याची खात्री केली जाणार आहे. रुग्णालयांनी सुधारणा केली नसल्यास त्यानंतर त्यांच्यावर कारवाईचे पाऊल आरोग्य विभाग उचलणार आहे.

### खासगी रुग्णालयांची तपासणी

एकूण खासगी रुग्णालये – ८४९

तपासणी झालेली रुग्णालये – ७१४

नोटीस पाठवलेली रुग्णालये – ७६

> महापालिकेककडून खासगी रुग्णालयांची तपासणी मोहीम सुरू असून, उपचारांचे दरपत्रक दर्शनी भागात न लावणे, रुग्ण हक्क संहिता नसणे यांसह इतर नियमांचे पालन होत नसल्याचे काही ठिकाणी निदर्शनास आले. याप्रकरणी ७६ रुग्णालयांना नोटीस बजाविण्यात आली आहे.
>
> **- डॉ. सूर्यकांत देवकर, सहायक आरोग्य अधिकारी, महापालिका.**

# स्मार्ट सिटीचे थकविलेले वीजबिल पालिका भरणार

## ठेकेदारावर कोणतीही कारवाई नाही : सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची वीजजोड तोडण्याची कारवाई सुरू

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील घडामोडींवर लक्ष ठेवण्यासाठी पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडने निगडी येथे सिटी कमांड ॲण्ड कंट्रोल सेंटर सुरू केले आहे. शहरात लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे या सेंटरला जोडले आहेत. सेंटर व कॅमेऱ्यासाठी स्वतंत्रपणे वीजजोड घेण्यात आले आहेत. वीजबिल न भरल्याने कॅमेऱ्यांचा वीजपुरवठा महावितरण कंपनीने तोडण्यास सुरुवात केली आहे.

थकबाकी भरल्याशिवाय महापालिकेस नवीन वीज मीटर दिला जाणार नाही, असा आक्रमक पवित्रा महावितरणने घेतला आहे. ते थकीत बिल महापालिका स्वत: भरणार आहे. असे असतानाही मुजोर दोषी ठेकेदारांवर कोणतीही कारवाई झाली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तसेच, कायदा व सुव्यवस्था कायम राहण्यासाठी स्मार्ट सिटी कंपनीने शहरभरात 5 हजारांपेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे उभे केले आहेत. कॅमेऱ्यासाठी वीजजोड घेण्यात आले आहेत. त्याला स्वतंत्रपणे महावितरणचे मीटर लावण्यात आले आहेत. ती वीजजोडणी स्मार्ट सिटी कंपनीचे ठेकेदार क्रिस्टल तसेच, स्मार्ट सिटीने घेतले होते. या वीजपुरवठ्याचे बिल संबंधित ठेकेदार क्रिस्टलने भरणे बंधनकारक आहे.



मात्र, क्रिस्टल किंवा स्मार्ट सिटी कंपनीने बिल न भरल्याने महावितरणने सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची वीजजोड तोडण्याची कारवाई सुरू केली आहे. वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांच्या सुरक्षितता आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच, थकबाकी भरल्याशिवाय महापालिकेस नवीन वीज मीटर देण्यास नकार दिला जात आहे. त्यामुळे महापालिकेने स्वत: थकीत वीजबिल भरावे, असा प्रस्ताव अणुविद्युत व दुरसंचार विभागाने ठेवला होता.

त्या प्रस्तावाला आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे. थकीत बिल भरून ते ठेकेदार क्रिस्टल किंवा स्मार्ट सिटी कंपनीच्या बिलातून वसूल करण्यात येणार आहे. वीजबिल भरणे बंधनकारक असताना संबंधित ठेकेदारांनी ते भरले नाही. महावितरणने वीजपुरवठा तोडला आहे. त्यामुळे महापालिकेची नाहक बदनामी झाली आहे. असे असताना मुजोर ठेकेदारांवर कोणताही कारवाई न केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### कमांड ॲण्ड कंट्रोल सेंटरची वीज तोडली

» निगडी येथील टिळक चौकातील अस्तिव मॉलच्या इमारतीत स्मार्ट सिटीअंतर्गत सिटी कमांड ॲण्ड कंट्रोल सेंटर सुरू आहे. मोठ्या प्रमाणात खर्च करूनही हा स्मार्ट सिटीतील सर्वाधिक रेंगाळलेला प्रकल्प आहे. अद्याप हे सेंटर 100 टक्के क्षमतेने सुरू झालेले नाही. स्मार्ट सिटीच्या भोंगळ कारभारातून या सेंटरचे सप्टेंबर 2024 महिन्याचे विजेचे बिल मुदतीमध्ये न भरल्याने महावितरणने वीजपुरवठा 25 नोव्हेंबर 2024 ला खंडित केला.

सेंटरचे काम करणारे ठेकेदार टेक महिंद्रा कंपनीने बिल भरले नाही. अखेर, तातडीची बाब म्हणून अ क्षेत्रीय कार्यालयाने 92 लाख 45 हजार 620 रुपयांची वीजबिलाची थकबाकी भरली. त्यामुळे सेंटरचा वीजपुरवठा पुन्हा सुरू करण्यात आला आहे. या खर्चास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी 24 डिसेंबर 2024 च्या स्थायी समिती सभेत कार्योत्तर मान्यता दिली.

# पिंपरी-चिंचवडकर पिताहेत केमिकलयुक्त पाणी

## प्रदूषित पाणी पिण्यायोग्य करण्यासाठी दररोज होतोय 2 हजार 500 मेट्रिक टन क्लोरिन गॅस, 625 किलो ब्लिचिंग पावडरचा वापर

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रदूषित पाणी पिण्यायोग्य बनविण्यासाठी निगडीच्या जलशुद्धीकरण केंद्रात दररोज २ हजार ५०० मेट्रिक टन क्लोरिन गॅस आणि ६२५ किलो ब्लिचिंग पावडरचा वापर करावा लागत आहे. तरीही प्रदूषणाचे अनेक घटक पाण्यात राहात असून ते पाणी पिंपरी-चिंचवडकरांना पिण्यासाठी दिले जात आहे. त्यामुळे शहरवासियांच्या जिवाशी खेळ सुरू असल्याची टीका जागरूक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची जीवनवाहिनी असलेल्या पवना नदीने देशातील अतिप्रदूषित नद्यांच्या यादीत स्थान मिळविले आहे. नदीच्या प्रदूषणात प्रचंड वाढ झाली आहे. पवना धरणापासून ते रावेत बंधारा येथील पाणीउपसा केंद्रापर्यंत विविध कंपन्यांचे रासायनिक व केमिकल्सयुक्त पाणी, विविध सोसायटीचे मैलामिश्रित आणि सांडपाणी, लॉन्ड्रीचे साबण तसेच रसायनयुक्त पाणी हे पिंपरी-चिंचवड शहरासाठी आलेल्या पिण्याच्या पाण्यात मिसळत आहे.



### पाणी शुद्धीकरणासाठी केमिकल्सचा उतारा

» शहरातील सुमारे ३० लाख नागरिकांना पिण्यायोग्य पाणी देण्यासाठी निगडीच्या सेक्टर २३ मध्ये २०२०-२०२१ मध्ये वर्षभरासाठी १५० टन इतकी ब्लिचिंग पावडर लागत होती. तीदेखील शिल्लक राहायची, २०२३-२०२४ मध्ये वर्षभरासाठी तब्बल ३५० ते ४०० टन इतकी ब्लिचिंग पावडर लागली. त्यामुळे पवना नदीच्या प्रदूषणाची पातळी किती वाढली, याचा अंदाज येईल. पावसाळ्यात दररोज दोन किलो तुरटी लागत होती. तिचे प्रमाण आता आठ किलोवर गेले आहे.

### पाण्यातील टीडीएस 100 ते 110 पीपीएमपर्यंत वाढले

» माणसाला पिण्यायोग्य पाण्याचेदेखील मानांकन ठरवले आहे. मात्र, नदी प्रदूषण वाढल्याने त्या पाण्यात विरघळलेले घन पदार्थ ( Total Dissolved Solids ) वाढत असतात. त्या विरघळलेल्या घन पदार्थांमध्ये सोडियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम केशन्स आणि क्लोराईड, बायकार्बोनेट, कार्बोनेट, फॉस्फेट, सल्फेट आणि नायट्रेट आयनसारख्या अजैविक क्षारांचा समावेश असतो. पूर्वीचे पवना नदीत टीडीएसचे प्रमाण हे ६० ते ७० पीपीएम होते. आता हेच प्रमाण १०० ते ११० पीपीएम पर्यंत गेले आहे. प्रदूषण वाढल्याने क्षारांचे प्रमाणदेखील वाढले आहे.

> पवना नदी उगम स्थानापासून रावेत उपसा जलशुद्धीकरणपर्यंत नदीचे प्रदूषण वाढले आहे. हे प्रदूषण रोखणे काळाची गरज आहे. शहरातील नागरिकांना पिण्यायोग्य पाणी आम्ही देत आहोत. परंतु, पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी पूर्वीपेक्षा अधिक केमिकल्सचा वापर होऊ लागला आहे. नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. जेणेकरून पिंपरी-चिंचवडकरांना प्रदूषण विरहित पाणी मिळण्यास मदत होईल.
>
> - प्रशांत जगताप, मुख्य केमिस्ट, जलशुद्धीकरण केंद्र, निगडी

याशिवाय मृत जनावरे, जलपर्णी, वेगवेगळा कचरादेखील त्या बंधाऱ्यात आढळून येत आहे. अशाप्रकारे विविध रासायनिक आणि केमिकल्सयुक्त असलेले सर्वाधिक प्रदूषित पाणी हे रावेत बंधाऱ्यातून पाणी उपसा केंद्रातून उचलून ते निगडीच्या जलशुध्दीकरण केंद्रात आणून त्यावर किलो क्लोरिन गॅस आणि ब्लिचिंग पावडरचा मारा करून ते पाणी पिण्यायोग्य बनविले जात आहे. मात्र, ते पाणी पिण्यायोग्य असले तरीही त्यात काही प्रमाणात प्रदूषणाचे घटक कायम राहात आहेत.

पिंपरी-चिंचवड शहराला पिण्याच्या पाण्यासाठी मावळातील पवना धरणातून पाणीपुरवठा करण्यात येतो. पवना धरणातून नदीद्वारे पाणी सोडल्यानंतर ते रावेत बंधाऱ्यातून उचलले जाते. धरणातून पालिका पाणीपुरवठा विभाग दररोज ४८० ते ५१० एमएलडी पाणी शहरासाठी घेण्यात येते. मात्र, शहराची लोकसंख्या सद्यस्थितीत सुमारे ३० लाखाच्या घरात असून हे पाणी शहराला दिवसाआड पुरेसे प्रमाणात द्यावे लागत आहे.

शहराचे वाढते नागरीकरण, औद्योगिक क्षेत्रामुळे पवना नदीच्या प्रदूषणात वाढ होत असून, कधी काळी स्वच्छ पाणी घेऊन वाहणारी पवना नदीला गटाराचे स्वरूप आले आहे. शहरातून सुमारे २५ किलोमीटर पवना नदी प्रवाहित होत आहे. पवना नदीचा उगम स्थानापासून रावेत बंधाऱ्यापर्यंत नदीत मैलामिश्रित सांडपाणी, रसायन, निर्माल्य, घनकचरा, मांस, चिकन, मासे यांचा कचरा आदी बरेच काही जसेच्या तसे नदीत सोडून दिले जात आहे.

# पिंपरी चिंचवड शहरातील मेट्रो स्टेशन्स भकास; महामेट्रोकडून दुजाभाव

## पुणे शहरातील मेट्रो स्टेशन्सच्या आकर्षक रचनांच्या तुलनेत, पिंपरी-चिंचवड शहरातील मेट्रो स्टेशन्स कमी आकर्षक असल्याने भकास दिसत आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे शहरातील मेट्रो स्टेशन्सच्या आकर्षक रचनांच्या तुलनेत, पिंपरी-चिंचवड शहरातील मेट्रो स्टेशन्स कमी आकर्षक असल्याने भकास दिसत आहेत. पिंपरी-चिंचवडमधून मिळणारे प्रवासी उत्पन्न विक्रमी असूनही, पिंपरी-चिंचवडबाबत महामेट्रो कॉर्पोरेशनकडून दुजाभाव होत असल्याचे स्पष्ट होत आहे.

पुणे शहराच्या तुलनेत, पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी ते दापोडी अशी केवळ 7.5 किलोमीटर अंतर मेट्रो ट्रेन धावत आहे. तसेच, विस्तारीत मार्गात केवळ पिंपरी ते चिंचवड या 4.5 किलोमीटर अंतराच्या एकमेव मार्गाचा समावेश केला गेला आहे. त्याचे काम सध्या सुरू आहे. पिंपरी, संत तुकारामनगर, नाशिक फाटा, कासारवाडी, फुगेवाडी आणि दापोडी ही सहा मेट्रो स्टेशन्स आहेत. या सर्व मेट्रो स्टेशन्सचा आकार आयताकृती बंद डब्यासारखा आहे. कोणत्याच स्टेशनला आकर्षक सजावट केलेली नाही. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या सौंदर्यात भर पडत नसल्याचा आरोप केला जात आहे



### दुभाजकात रोपे न लावल्याने परिसर विद्रुप

» शहरात मेट्रो 6 मार्च 2022 पासून धावत आहे. मात्र, अद्याप मेट्रोने दुभाजकात माती टाकून झाडे व रोपे लावलेली नाहीत. पिलर स्वच्छ केले जात नसल्याने धूळ व पावसाचे पाणी साचून ते घाणेरडे दिसत आहे. मेट्रोने बांधलेले दुभाजक अनेक ठिकाणी तुटले आहेत. तसेच, कॉक्रीटच्या रस्त्यांना मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या आहेत. संत तुकाराम नगर मेट्रो स्टेशनखालील दुभाजक न लावल्याने पादचारी धोकादायकरित्या ग्रेडसेपरेटरचा मार्ग ओलांडतात. त्यामुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. स्टेशनखालील झाडे व रोपांची निगा न राखल्याने ती जळून गेली आहेत. तसेच, काही स्टेशन खाली प्रकाश व्यवस्था नसल्याने रात्रीच्या वेळेत अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पुण्यातील भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमीवर त्या-त्या भागांत आकर्षक रचनाकृतींची लक्षवेधी मेट्रो स्टेशन्स तयार करण्यात आली आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात मात्र, मेट्रो स्टेशनच्या सजावट व आकर्षक रचनेकडे साफ दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. पुणे-पिंपरी चिंचवड मेट्रो नामविस्तारास प्रशासनाने केराची टोपली दाखविली आहे. पीसीएमसी व भोसरी ही मेट्रो स्टेशन्सची चुकीची असूनही नाव बदलण्यास मेट्रोकडून अजिबात प्रतिसाद दिला जात नाही.

तसेच, महापालिकेने केलेल्या आकर्षक चौकांची रचना मेट्रोने बदलून टाकली आहे. मोरवाडी चौकात महापालिकेने केलेल्या सुशोभीकरणास मेट्रोच्या जिन्यामुळे रया गेली आहे. चौकात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. पिंपरी येथील कमलाक्रॉस बिल्डिंगसमोर अनेक वर्षांनंतर स्टेशनचा चौथा जिना तयार केला जात असल्याने वाहतूक कोंडीत भर पडत आहे. तसेच, मोरवाडीहून पिंपरीकडे जाणारा बीआरटी मार्ग बंद करण्यात आल्याने सर्व्हिस रस्त्यावरून बसेस धावत असल्याने कोंडीत भर पडत आहे..

# वडगावशेरीत पाण्याचे राजकारण सुरूच; कमी दाबाने पाणीपुरवठा,नागरिक त्रस्त

## मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करण्याचा आमदारांचा इशारा, पाण्याच्या टाक्या पूर्णपणे भरल्या जात नसल्याने आपुरा पाणीपुरवठा

**पुणे | प्रतिनिधी**

वडगावशेरी मतदारसंघात खराडी भागासह इतर भागात कमी दाबाने पाण्याचा पुरवठा केला जात आहे. तसेच या भागातील पाण्याच्या टाक्या पूर्णपणे भरल्या जात नसल्याने आपुरा पाणीपुरवठा होत आहे. पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याने नागरिकांच्या तक्रारी वाढल्या आहे. विधानसभा निवडणुकीपासून सुरु झालेली पाण्याची टंचाई अद्याप सुरुच असल्याने विरोधी पक्षाचा आमदार असल्याकारणे मुद्दाम महापालिकेचे अधिकारी पाणीपुरवठा करण्यास हात आखडता घेत आहेत का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. निवडणुकीचा निकाल लागून आता तीन महिने झाले तरी पाणी प्रश्न सुटत नसल्याने याप्रकरणी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे आमदार बापूसाहेब पठारे सांगितले.

महापालिकेच्या शहरातील विविध जलकेंद्राची देखभाल दुरुस्तीची कामे करण्यासाठी सुरु आहेत. यामुळे आधुनमधून पाणी पुरवठा बंद ठेवला जातो. पण त्यानंतर पाणीपुवरठा सुरळीत होईल, असे विभागाकडून सांगण्यात येत होते. परंतु अद्यापही अनेकांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याने पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. शहराला पाणी पुरवठा करणारे धरणे शंभर टक्के भरली आहेत. शहराला पुराचा फटका देखिल सहन करावा लागला होता. मुबलक प्रमाणात पाणी असून देखिल शहरातील नागरिकांच्या घश्याला कोरड पडली आहे. यामुळे वडगावशेरी मतदारसंघातील नागरिक त्रासले आहेत. असा आरोप नागरिकांकडून केला जाऊ लागला आहे.

वडगाव शेरी, खराडी, चंदननगर, हडपसर, मांजरी, वाघोली आदी भागात पुरेशा प्रमाणात पाण्याचा पुरवठा होत नाही. गेल्या चार ते पाच महिन्यांपासून अनेक भागात कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. अनेक भागातील ड्रेनेज लाईन जीर्ण झाल्या असल्याने घाण पाणी थेट पाण्याच्या पाईल लाईनमध्ये मिसळले जात आहे. त्यामुळे नागरिकांना हिरवट दुषित पाण्याचा पुरवठा होत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे अनेकवेळा तक्रार करुन सुध्दा पाणी प्रश्न सुटत नसल्याने अधिकाऱ्यांच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले आहे.



### महापालिकेची 34.71 टीएमसी पाणी कोटा वाढवून देण्याची मागणी...

» पुणे शहराची झपाट्याने लोकसंख्या वाढत आहे. शहरासह समाविष्ट गावांमध्ये पाणीपुरवठा करणे महापालिकेला अपयश आले आहे. पुणे शहराला खडकवासला धरण प्रकल्प, भामा आसखेड, पवना या धरणातून १६.३६ टीएमसी पाणी मंजूर करण्यात आले आहे. पण जुन्या हद्दीची लोकसंख्या, नव्याने समाविष्ट झालेली ३४ गावे याचा विचार करता वर्षाला ७२ लाख नागरिकांसाठी २१ टीएमसीपेक्षा जास्त पाणी लागत आहे. पुढील ३० वर्षांचा विचार करून महापालिकेने २०५१पर्यंत ३४.७१ टीएमसी पाणी कोटा मंजूर करावा अशी मागणी पुणे महापालिकेकडून जलसंपदा विभागाला केली आहे.

### पाण्याच्या वाढीव कोट्याची गरज

» महापालिकेने पाटबंधारे विभागाला लिहिलेल्या पत्रात ३४ गावांसाठी भविष्यातील लोकसंख्या वाढ विचारात घेता २०३७ मध्ये ७.७५ टीएमसी, २०५२ मध्ये सुमारे ११.५ टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. सध्या पुणे महापालिकेसाठी मंजूर केलेल्या पाणी कोट्याचा वापर करून समाविष्ट गावांसाठी पाणीपुरवठा योजना राबविणे अशक्य आहे. भविष्यातील वाढीव लोकसंख्येचा विचार करता मुळशी धरणातून ५ टीएमसी पाण्याची मागणी केली आहे, पण त्याचा निर्णय अद्याप झालेला नाही. पुणे शहराची जुनी हद्द व नवी हद्द याचा विचार करता २०२७ पर्यंत १ कोटी ७ लाख ४ हजार इतकी गृहीत धरली असून, त्यासाठी २७.१७ टीएमसी, तर २०५२पर्यंत १ कोटी ३६ लाख ८३ हजार इतकी लोकसंख्या गृहीत धरली आहे. त्यासाठी ३४.१७ टीएमसी पाणी आवश्यक आहे.

“ वडगावशेरीसह खराडीतील पाण्याच्या टाक्या भरत नाहीत. वरून पाणी कमी दाबाने येत आहे. त्यामुळे कमी दाबाने पाणी पुरवठा केला जातो. असे अधिकारी सांगत आहेत. निवडणुक काळात निर्माण केलेला प्रश्न अद्याप तसाच सुरु ठेवला. जुने वॉलमन असल्याने ते जाणूनबुजून असे करतात का अशी शंका येत आहे. त्यामुळे त्यांची बदली करावी. वेळोवेळी पाणीपुरवठा विभागाकडे तक्रार केली आहे. मात्र पाण्याचे राजकारण केले जात आहे का असा प्रश्न उपस्थित होत आहे. याप्रकरणी महापालिका आयुक्तांकडे तक्रार केली जाणार आहे. हा प्रश्न मार्गी लागला नाही तर मुखमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार करावी लागेल. विरोधी पक्षाचा आमदार या मतदारसंघात असल्यामुळे असे केले जात आहे का प्रश्न आहे. पाणीपुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक लावण्यात आली आहे. या बैठकीत कमी दाबाने पाणीपुरवठा का केला जात आहे, याची कारणे समोर येथील..

- बापूसाहेब पठारे, आमदार, वडगावशेरी मतदारसंघ.

# लाडक्या बहिणींना सोडवा लागणार ‘लाभ’; शासनाने घेतला मोठा निर्णय

## सरकारच्या तिजोरीवर बोजा वाढल्याने शासनाने या योजनेच्या निकषांत अनेक बदल केले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

युती सरकारची महत्वकांशी योजना म्हणजे मुख्यमंत्री लाडकी बहिणी योजना. सुरुवातीला या योजनेच्या माध्यमातून राज्यातील मोठ्या प्रमाणावर लाडक्या बहिणींला लाभ घेता आला. मात्र, सरकारच्या तिजोरीवर बोजा वाढल्याने शासनाने या योजनेच्या निकषांत अनेक बदल केले आहेत. तसेच ज्या लाडक्या बहिणींना इतर योजनाच्या माध्यमातून लाभ मिळत आहे, त्यांनी लाडकी बहिण योजनेचा मिळणार लाभ सोडावा, असे आवाहन शासनाकडून करण्यात आले होते.

मात्र, यास तितकासा प्रतिसाद मिळाला नसल्याचे समोर आले होते. यातच आता राज्यातील लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन केलेल्या पडताळणीची यादी समोर आली आहे. पुणे जिल्ह्यातील ७५ हजार १०० लाभार्थी महिलांकडे किंवा त्यांच्या कुटुंबीयांच्या नावे चारचाकी वाहन असल्याचे समोर आले आहे. या यादीनुसार आता जिल्हा परिषदेच्या अंगणवाडी सेविका घरोघरी जाऊन माहिती घेणार आहे.



### मुख्यमंत्री लाडकी बहिण योजेनेचे ‘हे’ आहेत निकष

- लाभार्थी महिलेचे वय १८ ते ६५ वर्षांच्या दरम्यान असावे.
- कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांच्या आत असावे.
- कुटुंबातील कोणताही सदस्य सरकारी नोकरीत नसावा तसेच प्राप्तिकर भरणारा नसावा.
- संजय गांधी निराधार योजनेसारख्या अन्य योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- कुटुंबाच्या नावावर चारचाकी वाहन असल्यास अर्जदार अपात्र ठरेल.

### शासनाकडून पडताळणी केली जाणार

» शासनाला मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळावा, यासाठी 21 लाख 11 हजार 991 एकूण अर्ज प्राप्त झाले होते. प्राप्त अर्जांपैकी 20 लाख 89 हजार 946 बहिणींनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे. तर 75 हजार 100 बहिणींकडे त्यांच्या कुटुंबीयांकडे चारचाकी वाहने असल्याचे समोर आले आहे. यामध्ये वाहनधारकांच्या दोन याद्या आहेत. एका यादीत 58 हजार 350 दुसऱ्या यादीत 16 हजार 750 अशी एकूण 75 हजार 100 वाहनधारकांची यादी प्रशासनाला मिळाली आहे. त्यानुसार शासनाने जिल्हा परिषदेला पडताळणी करण्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे पडताळणीचे काम कमी कालावधीत होऊन शासनाला अपात्र लाभार्थ्यांची यादी प्रशासनाकडून पाठवणार असल्याचे समोर आले आहे.